वाचले – १) मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. २८/०६/२०२३ रोजीचे मंजुर प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे-४११०१८
बांधकाम परवानगी व अनधिकृत
बांधकाम नियंत्रण विभाग

जा.क्र. – बीपी/०५/कावि/69 /२०२३
दिनांक- 04 /07/२०२३

विषय – Slum TDR वापराबाबत तात्पुरते धोरण...

आदेश,

उपरोक्त विषयास अनुसरुन मंजुर एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० (UDCPR) डिसेंबर २०२० पासुन लागु झाली असुन त्यामध्ये नियम क्र. ११.२.७ ii) नुसार खालीलप्रमाणे तरतुदी आहेत .The quantum of maximum permissible TDR loading mentioned in table 6-G of Regulation No.6.3 shall include minimum 30% and maximum 50% slum TDR/URT/AmenityTDR ( wherever applicable ).If such TDR is not available, the other TDR may be used .

वरील नियमानुसार ३०% ते ५०% slum/AmenityTDR चा वापर करणे विकासकावर बंधनकारक आहे. मनपा परिसरात Slum TDR /AmenityTDR ची उपलब्धता कमी आहे. त्यामुळे एकुण TDR वापरणेवर मर्यादा आल्या आहेत. अध्यक्ष क्रेडाई, पुणे, मेट्रो यांनी Slum TDR वापराबाबत सवलत मिळणेस विनंती केली होती . त्यानुसार बाजारात slum TDR ची उपलब्धता कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांनी तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे TDR वापराबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

१. Slum TDR एकुण खर्ची टाकणेच्या १० %
२. General TDR एकुण खर्ची टाकणेच्या ९० %

३. उर्वरित Slum TDR व General TDR पुर्णत्वाचे दाखल्याआधी वापरणेची मुभा देणे व तसे बंधनकारक करणे व त्यासंबंधीची नोंदी संबंधित विकसकाच्या बांधकाम परवानगी आदेश व नकाशामध्ये घेणे बंधनकारक असेल.

४. उर्वरित स्लम TDR वापरलेनंतर भोगवटा पत्रक देणेत येईल व याबाबत विकसकाकडुन हमीपत्र घेणे बंधनकारक राहील.

५. ३००.०० चौ.मी भुखंडासाठी टी.डी.आर (सर्वसाधारण/स्लम) वापरण्यास प्राधान्यक्रम राहणार नाही.

उपरोक्त धोरणास मा.आयुक्त सो यांनी वाचले क्र.१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब, मी. शहर अभियंता , पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे -१८ उपरोक्त नमुदकेलेप्रमाणे कार्यवाही करणेस सदर आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच सदर धोरण आदेशाच्या दिनांकापासुन पुढील ३ महिन्यांपर्यत अमंलात राहील तसेच तदनंतर सदर आदेश रद्द होवुन पुर्वीप्रमाणे TDR वापराचे प्रमाण व नियम लागु राहतील. तसेच सदर आदेशाची अमंलबजावणी आदेशाच्या दिनांकापासुन करणेत यावी.

शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे -१८